**<u>उलटतपास वादीकरीता विधीज्ञ श्री.एस.एस.शेख यांच्या वतीने शपथेवर सुरु</u>-**

१७. हे म्हणणे खरे नाही की, दि.२२/०४/१९९४ रोजी माझ्या पतीच्या व्यसनाचा गैरफायदा घेवून वादीने त्यांच्याकडून दावा जमिनीचे खोटे खरेदीखत लिहून घेतले, हे मी खोटे सांगते. माझ्या पुराव्याचे प्रतिज्ञापत्र माझ्या वकिलांनी मी दिलेल्या माहितीवरुन तयार केले. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या सर्व सहा मुलींचे लग्न झालेले असून त्या त्यांच्या सासरी नांदतात. प्रतिवादी क्र.२ हा माझा मुलगा असून तो किराणा दुकानामध्ये कामाला आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या अपत्यांच्या पालनपोषणाची जबाबदारी माझ्यावर नाही. माझ्या म्हणण्याप्रमाणे दावा दाखल केल्यापासून आमची जमीन पडीक आहे. आमच्या आणि वादीच्या जमिनीची कधी मोजणी झाली किंवा कसे, या बाबत मी सांगू शकत नाही. हे म्हणणे खरे आहे की, मोजणी होवून आमचे २० गुंठे क्षेत्र आमच्या ताब्यात मिळाल्यास आमच्यात कोणतीही तक्रार राहणार नाही.

१८. वादी हा आम्हाला आमच्या शेतात येण्यापासून अडथळा करतो या बाबत मी वादीविरुध्द पोलीस स्टेशनला तक्रार केलेली नाही. वादीने मला मारहाण केली म्हणून मी वादीविरुध्द पोलीस स्टेशनला तक्रार केली होती. त्या तक्रारीची प्रत मी या दाव्यात दाखल केलेली नाही. वादीने त्याच्या जमीनीमध्ये वहिती केल्यास आम्हाला कसलीही अडचण नाही. हे म्हणणे खरे नाही की, दावा जमीन आणि आमच्या जमिनीची मोजणी झाल्याचे मी खोटे सांगते. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी कैफियत दाखल केली व पुराव्याचे खोटे शपथपत्र दाखल केले.

**<u>उलटतपास पूर्ण</u>.**

**<u>फेरतपास नाही</u>.**

श्रवणोत्तर स्विकृत,

ASHISH BIHARILAL MARLECHA
Digitally signed by ASHISH BIHARILAL MARLECHA
Date: 2026.04.29 15:54:19 +0530

(आशिष बि. मरलेचा)
दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर
श्रीरामपुर, जि.अहमदनगर

दिनांक २९/०४/२०२६